"महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनासाठीच्या नवीन लेखाशिर्ष व संगणक सांकेतांक मान्यता देणेबाबत"

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग**

**शासन निर्णय क्रमांक :- आयटीआय-२०२०/प्र.क्र.२५८/व्यशि-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २५ ऑक्टोबर, २०२१

**वाचा :- आयटीआय-२०२०/प्र.क्र.१२७/व्यशि-३ दिनांक ०३.०६.२०२१**

**प्रस्तावना :-**

औद्योगिक आस्थापनांमध्ये उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांचा उपयोग करुन कुशल कारागीरास आवश्यक असलेले प्रशिक्षण देण्यासाठी शिकाऊ उमेदवारी कायदा,१९६१ अन्वये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना केंद्र सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता शिकाऊ उमेदवारी कायदा,१९६१ मध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी कायदा, २०१८ अस्तित्वात आलेला आहे. राज्याकरिता कायद्यामध्ये केलेल्या सुधारणेनुसार ३० व त्यापेक्षा जास्त मनुष्यबळ (कंत्राटी कर्मचाऱ्यांसह) असलेल्या आस्थापनेतील एकूण मनुष्यबळाच्या किमान २.५% ते कमाल २५% शिकाऊ उमेदवारीच्या जागा स्थित करणे बंधनकारक आहे. शिकाऊ उमेदवारीचा कालावधी व्यवसायनिहाय ६ ते ३६ महिने आहे. शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षित (Trained) तसेच अप्रशिक्षित (Fresher) उमेदवारांना प्रशिक्षण दिले जाते.

राज्यातील बेरोजगार उमेदवारांच्या संख्येचा विचार करता राज्यातील शिकाऊ उमेदवारी योजनेची व्याप्ती वाढविणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती वाढविण्यासाठी प्रोत्साहीत करण्याच्या द्दष्टीने शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेस पूरक अशी **"महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना"** सुरु करण्यास शासनाच्या संदर्भाधिन शासननिर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेंतर्गत प्रतिवर्ष १ लाख उमेदवारांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट आहे.

सदर योजनेकरीताचा निधी अर्थसंकल्पित करण्यासाठी नवीन लेखाशिर्ष व संगणक सांकेतांक देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती वाढवून प्रोत्साहीत करण्यासाठी "महाराष्ट्र शिकाऊ

उमेदवारी प्रोत्साहन योजनेस (Maharashtra Apprenticeship Promotion Scheme-MAPS)" दिनांक ०३ जून, २०२१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेसाठी निधी अर्थसंकल्पित करण्यासाठी तसेच शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनावर होणारा खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेले नवीन लेखाशिर्ष व संगणक सांकेतांक मंजूर करण्यात आलेला आहे. सदर योजनेचे लेखाशिर्ष खालिलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| मागणी क्र. | झेडए-२ | |
| मुख्य लेखाशीर्ष | २२३० | कामगार व सेवायोजन |
| उप मुख्य लेखाशीर्ष | ०३ | प्रशिक्षण |
| गौण शीर्ष | १०२ | शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण |
| गटशीर्ष | (०१) | शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण |
| उप गट शीर्ष | (०१)<br>(०२) | महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (कार्यक्रम) |

तसेच प्रधानशिर्ष २२३० अंतर्गत १०२ या गौणशिर्षाखाली २२३०ए७१९ असा आठ अंकि सांकेतांक आहे.

सदर शासन निर्णय महालेखापाल कार्यालय (लेखा व हकदारी) - I, महाराष्ट्र,मुंबई यांच्या क्र. सं:ख.वि/चा-१/कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/युओअर-६८/२०२०-२१/३५५ दिनांक २४.०९.२०२१ व वित्त विभाग यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२११०२५१७२५०६५९०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinod S
Bondre

Digitally signed by Vinod S Bondre
DN: c=IN, o=Maharashtra State Innovation Society, ou=eOffice, postalCode=400021, st=Maharashtra, 2.5.4.20=ee1740f2ea3726733cb0290a1d22b5ae7c4c794d1d0e095d5373b541c99dcb68, serialNumber=c313a8b86d67716d182c41d1e22f57d99c8ee5f4654a216d8fe23b5ad24ed271, cn=Vinod S Bondre
Date: 2021.10.25 17:31:32 +05'30'

**( विनोद बोंदरे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणसंचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंबाद/अमरावती/नागपूर
६. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

७. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय (सर्व)
८. महालेखापाल ( लेखा वअनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
९. महालेखापाल ( लेखा वअनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१०. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
११. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१२. अधिदान व लेखा अधिकारी ,मुंबई,
१३. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई,
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय (सर्व)
१५. उप सचिव, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभाग,मंत्रालय, मुंबई
१६. निवड नस्ती. (व्यशि-३)

**“महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना” शासन निर्णयाची अंमलबजावणी पुरकपत्र.**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन पुरकपत्र क्रमांक :- आयटीआय-२०२०/प्र.क्र.१२७/व्यशि-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २० मार्च, २०२३

वाचा:- कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. आयटीआय-२०२०/प्र.क्र.१२७/व्यशि-३ दिनांक ३.०६.२०२१

**शासन पूरकपत्र:-**

शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती वाढवून प्रोत्साहीत करण्याच्या दृष्टीने शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेस पूरक अशी “महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेस” शासन निर्णय दिनांक ०३ जून, २०२१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

२. महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन महाडिबीटी मार्फत थेट लाभ स्वरुपात (DBT) देण्यात येणार आहे. सदर विद्यावेतन हे शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेंतर्गत देण्यात येणारे विद्यावेतनाव्यतिरिक्त अतिरिक्त स्वरुपात ७५ टक्के किंवा ₹५०००/- यापैकी कमी असलेले विद्यावेतन देण्यात येणार आहे. तसेच, जे उमेदवार राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेंतर्गत विद्यावेतनाचा लाभ घेणार नाहीत अशा शिकाऊ उमेदवारांना महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेंतर्गत थेट स्वरुपात ₹ ५०००/- विद्यावेतन अदा करण्यात येईल. सदर योजनेचे योग्य कार्यान्वयन करण्याकरीता संचालनालय स्तरावर कक्ष स्थापन करण्यात येऊन त्याकरीता ५ टक्के निधी २२३०ए७१९ या लेखाशिर्षाखाली खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदरची मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे-

१. सर्व लाभार्थींचा अचूक तपशिल व Direct Beneficiary Transfer मध्ये ( थेट बँक अकाऊंट)विद्यावेतन वितरण होईल.
२. पुढील आर्थिक वर्षाकरीता Maha DBT वर सदर योजना राबविण्यात यावी व त्यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करावी.
३. सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात प्रलंबित विद्यावेतन हे ऑफलाईन पद्धतीने वितरित करण्यात यावे.

४. सदर शासन पूरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२३०३२०१२५१२००५०३ असा आहे. हे शासन पूरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANGEETA AJIT SHINDE

Digitally signed by SANGEETA AJIT SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILL DEVELOPMENT ENTREPRENEURSHIP AND EMPLOYMENT DEPARTMENT, 2.5.4.20=ba607066e7a34e428b7c7c73de0f7e09a315a2af5075fd47f1e08389aa137b81, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DDF4C16E4A3043BBAA409E4ECF901CA0490CE93C66913DE88A7769927FF5E261, cn=SANGEETA AJIT SHINDE
Date: 2023.03.20 12:56:10 +05'30'

**( संगीता शिंदे )**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. महालेखापाल (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)-१ व २ मुंबई व नागपूर,
२. मा.मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई

३. मा.मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/नागपूर
८. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय (सर्व)
९. अधिदान व लेखा अधिकारी ,मुंबई,
१०. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई,
११. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय (सर्व)
१२. प्रधान सचिव, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१३. सह सचिव/उप सचिव, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभाग,मंत्रालय, मुंबई
१४. सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक), मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र (सर्व) (संचालनालयामार्फत)
१५. निवड नस्ती. (व्यशि-३)

“महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना” राबविण्यास मान्यता देणेबाबत...

# महाराष्ट्र शासन

## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग

## शासन निर्णय क्रमांक :- आयटीआय-२०२०/प्र.क्र.१२७/व्यशि-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०३ जून, २०२१.

**प्रस्तावना :-**

औद्योगिक आस्थापनांमध्ये उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांचा विनियोग करुन कुशल कारागीरास आवश्यक असलेले प्रशिक्षण देण्यासाठी शिकाऊ उमेदवारी कायदा,१९६१ अन्वये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना केंद्र सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता शिकाऊ उमेदवारी कायदा,१९६१ मध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी कायदा, २०१८ अस्तित्वात आलेला आहे. राज्याकरिता कायद्यामध्ये केलेल्या सुधारणेनुसार ३० व त्यापेक्षा जास्त मनुष्यबळ (कंत्राटी कर्मचाऱ्यांसह) असलेल्या आस्थापनेतील एकूण मनुष्यबळाच्या किमान २.५% ते कमाल २५% शिकाऊ उमेदवारीच्या जागा स्थित करणे बंधनकारक आहे. सदर योजना २७ गटांतील २५८ निर्देशित (Designated), ३५ क्षेत्रातील ४१४ वैकल्पिक (Optional), तंत्रज्ञ (व्यावसायिक) अंतर्गत ६ गटातील २० आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळाच्या १२३ व्यवसायांना शिकाऊ उमेदवारी लागू करण्यात आलेली आहे. शिकाऊ उमेदवारीचा कालावधी व्यवसायनिहाय ६ ते ३६ महिने आहे. शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षित (Trained) तसेच अप्रशिक्षित (Fresher) उमेदवारांना प्रशिक्षण दिले जाते.

कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावामुळे राज्यातील कामगारांच्या परराज्यातील स्थलांतरामुळे आस्थापनांना मनुष्यबळाची कमतरता जाणवत आहे. राज्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना नवनवीन उद्योग व सेवाक्षेत्राच्या मागणीनुसार प्रशिक्षित करुन रोजगार व स्वयंरोजगारक्षम बनविण्याची गरज निर्माण झालेली आहे.

राज्यातील बेरोजगार उमेदवारांच्या संख्येचा विचार करता राज्यातील शिकाऊ उमेदवारी योजनेची व्याप्ती वाढविणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती वाढवून प्रोत्साहीत करण्याच्या दृष्टीने शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेस पूरक अशी **“महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना”** सुरु करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय** :-

शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती वाढवून प्रोत्साहीत करण्यासाठी “महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेस (Maharashtra Apprenticeship Promotion Scheme-MAPS)”

मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक ०८ मार्च, २०२१ रोजीच्या विधानभवन, मुंबई येथे पार पडलेल्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी योजना राज्यात राबविण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या ७५% किंवा जास्तीत जास्त रु.५०००/- यापैकी कमी असेलेले विद्यावेतन शिकाऊ उमेदवारांना शासनातर्फे अनुज्ञेय राहील. तथापि, राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत आस्थापनांना अनुज्ञेय ठरणारी विद्यावेतन प्रतिपूर्ती आणि महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना अनुज्ञेय ठरणारा विद्यावेतनाचा आर्थिक लाभ एकत्रितपणे देय एकूण विद्यावेतनाच्या ७५% पेक्षा अधिक अनुज्ञेय ठरणार नाही.

३. महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना या योजनेअंतर्गत मुलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (Basic Training Provider) रु.२०/- प्रतितास या दराने (केंद्र शासनाकडून मिळणारी प्रतिपूर्ती रु. १५/- प्रतितास वजा करुन) जास्तीत जास्त ५०० तासांकरीता रु. २,५००/- एवढी प्रशिक्षण खर्च प्रतिपूर्ती मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय राहील. तसेच ज्या मुलभूत प्रशिक्षण देण्याऱ्या संस्थेस (Basic Training Provider) केंद्र शासनाकडून प्रशिक्षण प्रतिपूर्ती मिळणार नाही, अशा संस्थांना रु.२०/- प्रतितास या दराने जास्तीत जास्त ५०० तासांकरीता रु.१०,०००/- एवढी प्रशिक्षण खर्च रक्कम प्रतिपूर्ती मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय राहील.

४. शिकाऊ उमेदवाराच्या मूलभूत प्रशिक्षण कालावधीत सदरील लाभ शिकाऊ उमेदवारांना अनुज्ञेय असणार नाही. तथापि, मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (Basic Training Provider) प्रशिक्षण खर्च प्रतिपूर्ती प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय राहील.

५. शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत २७ गटांतील २५८ निर्देशित (Designated), ३५ गटांतील ४१४ वैकल्पिक (Optional), ६ गटांतील २० तंत्रज्ञ (व्यावसायिक) [Technician (Vocational)]आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळाचे १२३ व्यवसाय महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेसाठी समाविष्ट राहतील. सदरील व्यवसायांमध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणेनुसार सुधारीत व्यवसायही महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेमध्ये समाविष्ट राहतील.

६. महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रथमत: प्रतिवर्षी १,००,००० उमेदवारांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट राहील.

७. महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेची सुलभ, प्रभावी, जलद अंमलबजावणी व संनियंत्रण पारदर्शक व सुलभ व्हावे याकरीता केंद्र शासनाच्या www.apprenticeshipindia.org.in या संकेतस्थळाला संलग्न असे स्वतंत्र नवीन संकेतस्थळ तयार करण्यात येईल.

८. महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेसाठी "संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य" यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील "लेखा अधिकारी (महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्ग)" यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

९. महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेचा खर्च भागविण्यासाठी विभागाचा मागणी क्रमांक झेडए-२ अंतर्गत "२२३० - कामगार व सेवायोजन" या मुख्य लेखाशिर्षाखाली स्वतंत्र उप लेखाशिर्ष व संगणक सांकेतांक उघडण्यात येऊन, त्याखाली उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून खर्च भागविण्यात येईल.

सदर योजनेच्या कार्यान्वयनाकरीता राबविण्यात येणारी कार्यपध्दतीबाबतचे मार्गदर्शक तत्वे विभागाव्दारे स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२१०६०३१२३१४५८८०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinod Sheshrao Bondre

Digitally signed by Vinod Sheshrao Bondre
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Skill Development and Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4bd97b779f6f1e9e61491311a06aac663b01b00963f2e754c6ee2d5f7c14953d, serialNumber=c313a8b86d67716d182c41d1e22f57d99c8ee5f4654a216d8fe23b5ad24ed271, cn=Vinod Sheshrao Bondre
Date: 2021.06.03 16:39:41 +05'30'

**( विनोद बोंदरे )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा.मंत्री, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री, कौशल्य विकास,रोजगार आणि उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई
८. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासनिक विभाग यांचे स्वीय सहाय्यक
११. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई

१२. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)

१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई

१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई

१५. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणसंचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई

१६. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

१७. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय (सर्व)

१८. सर्व शासकीय कार्यालये /महामंडळे/महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद/जिल्हा परिषदा.

१९. महालेखापाल ( लेखा वअनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,

२०. महालेखापाल ( लेखा वअनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,

२१. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,

२२. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,

२३. अधिदान व लेखा अधिकारी ,मुंबई,

२४. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई,

२५. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय (सर्व)

**प्रत,**

१) मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

२) मा. अध्यक्ष, विधान सभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

३) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

४) मा.विरोधी पक्षनेता, विधान सभा,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

५) प्रधान सचिव, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहाय्यक

६) सह सचिव/उप सचिव, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभाग,मंत्रालय, मुंबई

७) निवड नस्ती. (व्यशि-३)